# समर्थ राष्ट्रधर्म

**एस. डी. कोंडोलीकर**
स्वा.से.श्री.क.रा. इन्नाणी महाविद्यालय कारंजा (लाड) जि.वाशिम
Email – dkondolikar@gmail.com

## सारांश

*प्राचीन भारतीय जीवनधर्म परंपरेतील सगळी श्रेष्ठ तत्वे समर्थ वाङमयात प्रकट झाली आहेत. संतांनी महाराष्ट्रातील समाज जीवनाच्या सर्व थरात श्रध्दाजीवन उत्पन्न करुन ही जी राष्ट्रजीवनाची भूमिका सिध्द केली, तिच्यात पुनरुत्थानाचे तेज ओतणारा, त्यासाठी योजनाबध्द कार्याची आखणी करणारा व नव्या युगाच्या आगमनाची साद घालणारा महामांत्रिक हवा होता. तो महाराष्ट्राला श्री समर्थांच्या रुपाने मिळाला. महाराष्ट्रात संत परंपरेने निर्माण केलेल्या निष्ठाजीवनात तेज व पुनरुत्थानाची आकांक्षा निर्माण करणारें अवतारी पुरूष श्री समर्थ रामदास हे होते. वर्तमान संदर्भात आज सर्वत्र दिसत असणारे लोकशाहिच्या नावाने चालणारे भ्रष्ट राजकारण, पर्यावरण संतुलनातून पृथ्वीची होत असणारी दैना, सामान्य लोकांना वर होणारे अन्याय अत्याचार, धर्माच्या नावाखाली माजलेला गोंधळ हया सर्वांचा नायनाट करुन मानव सुखाचा शोध व माणसाचा शोध घेण्यासाठी संत शिकवणूकीचा, विचारांचा मागोवा घेणे नितांत गरजेचे झाले आहे. समर्थांच्या "धर्म राजकारण समवेत चालती शक्ती युक्ती एकवटूनी कार्य साधती' हयाचा माणसातील माणुसकी लक्षात घेवून कार्य होणे गरजेचे आहे.भूमी आणि मानव व त्याचे सुख हेच सर्व श्रेष्ठ धन, वैचारिक धन प्राप्त करण्यासाठी आज "वर्तमान संदर्भात संत साहित्याची प्रबोधन क्षमता" फार मोठी आहे व नितांत गरजेचीही आहे.*

## प्रस्तावना

मराठी संतांनी रुळवलेली भक्तीची वाट काहीशा वेगळयापणाने पुढे नेणारे संत ठरले ते समर्थ रामदास.मनाची उंची वाढवण्याचे कार्य सर्वच संतांनी केले.शारिरीक आणि मानसिक आरोग्य हे माणसाला जगण्याचे बळ देत असते.महाराष्ट्रातील मराठी संतांनी भक्तीच्या माध्यमातून मराठी माणसाला जे नैतीक पाठबळ दिले त्यातून आजतागायत माणूस माणुसकीला जपण्याचा प्रयत्न करित आहे.हया मानसिक तेचे सखोल विवेचन व मनाचा विचार समर्थ रामदासांनी त्यांच्या साहित्यात केलेला आहे.

मनाची उंची वाढविण्याचे जे कार्य सर्वच संतांनी केले त्याच कार्याला समर्थ रामदासांनी राष्ट्रभक्तीची जोड दिली.मनामनात राष्ट्रनिष्ठा निर्माण करण्याचे कार्य हाती घेतले.

वेद वाङ्मय जगातील प्रचीनतम वाङ्मय असून त्यात तेजस्वी सर्वांगीण जीवन निष्ठा व्यक्त झाली आहे.
मातृभुमिनिष्ठ, राष्ट्रधर्म , राजा राजधर्म, क्षात्रधर्म, न्यायनितिधर्म, ब्राम्हणधर्म, ज्ञान - विज्ञान, निष्ठा,बालसामर्थ्य निष्ठा, सद्‌गुणसंवधन, नितीनिष्ठ, धनैश्वर्य , आदर्श गृहस्थधर्म,आदर्श व्यक्तिधर्म, प्रजानिष्ठ राज्यशासन, समानताधर्म,संघधर्म, दंडनीती, कर्मनिष्ठ , परिश्रम
निष्ठ , लौकिक विद्या या असंख्य जीवन निष्ठ तत्वांची सुत्रे वेदवाङ्मय आहेतख.

वेद वाङ्मयातील हीच तेजस्वी सर्वव्यापक सर्वांगीण जीवननिष्ठ रामायण, महाभारत, योगवासिष्ठ यांच्या माध्यमातून समर्थ वाङ्मयात उतरलेली आहे. वेदाअंगी सामर्थ्य असे जन उध्दारावया अशी त्यांची श्रध्दा होती. व्यक्ति जीवन आणि राष्ट्रजीवन यांच्या उत्कर्षासंबंधीची अनेक सूत्रे समर्थ वाङ्मयात आढळतात.

**ग्लेंच्छ दुर्जन उदंड | बहुता दिवसाचे माजले बंड |**
**या कारणे अखंड | सावधान असावे !**

परंपरेने पूजलेली, स्थिरावलेली जीवनमूल्ये परकीय आक्रमणांनी उद्ध्वस्त झाली होती.त्यातून लाचारी, स्वाभिमान शून्यता, स्त्रैणता आणि मलूलता आली होती. भूमंडळच या वृत्तीने ग्रासून गेले होते, म्हणून ते डळमळलेले भूमंडळ पुन्हा तेजाने उठवण्यासाठी, पुरुषार्थ जागा होण्यासाठी, समाजमन फुलावरुन येण्यासाठी समर्थांनी नवा राष्ट्रधर्म मनात कोरला आणि परकीय आक्रमणातून समाजात ज्या विषवल्ली

तयार झाल्या होत्या, त्या फेकून देण्यासाठी इथून तिथून मन समर्थ केले.

समर्थ त्या काळाचे नेतृत्व करीत होते तो काळ लोकदृष्टया दिशाहीनतेचा होता.उदासीनतेचा होता.हताशतेचा होता तसाच दुर्बलतेचाही होता.मने मरुन पडली होती.समाजाची चेतनाच हरवली होती. अशा समाजाला जागे करुन ध्येयसिध्दीसाठी त्याचे मन प्रबल करणे अत्यंत गरजेचे होते. समर्थांनी स्वत:च्या जीवनसर्मपणातून लोकनेतृत्व केले. लोकभान आणले आणि लोकमनात नवा विश्वास निर्माण केला.लोकांनी नेमके काय करावे, कोणती दिशा शोधावी व जीवन कसे कृतार्थ करुन घ्यावे यासाठी वैराग्य, विवेक व प्रयत्नवाद या तिन्हीचे महत्व पटविले.

समर्थ कर्मयोगी होते.प्रत्यय प्रचिती त्यांच्या जीवनतत्त्व ज्ञानाचा पाया होता.सर्व सतांनी निरुपिलेला परमार्थ विषय एकच. परंतु त्याच्या विवेचन पध्दती भिन्न आहेत. ज्ञानेश्वरांचा परमार्थ बुध्दिनिष्ठ; तर नामदेव तुकारामांचा काहीसा भावनिष्ठ, एकनाथांनी प्रतिपादिलेला प्रपंच व परमार्थ योग रामदासांच्या तत्वज्ञानात, प्रयत्नवादात व कर्मयोगात परिणत झाला. समर्थांनी प्रपंच व परमार्थाचा समन्वय साधून आपले श्रेय कसे मिळवावे याचा उपदेश, जीवनाची नवी दिशा दाखवून समर्थांनी केला. समर्थ वाड:मयाचा पाया अध्याम; तर गाभा परमार्थ आहे.

समर्थांनी इतर संतांप्रमाणे प्रपंचाचा विचार केला.परमार्थाचाही केला मुख्य ते हरिकथा निरुपणही सांगितले पण त्या सर्वाबरोबरच त्यांनी देशाचा व राष्ट्राचा असा एकत्रित विचार केला.

**भूमे मातर्निधेहि या भद्र या सुप्रतिष्ठितम् |**
**संविदाना दिवा कवे श्रियां या धेहिभूत्याम् ||**

हे भूमाते, कल्याणकारक बुध्दीने तू मला स्थिर कर. हे सुज्ञ माते, अशी प्रतिक्षण सर्व जाणणारी तू मला भौतिक संपत्ती दे.

अशी ही प्राणप्रिय असणारी भूमाता पारतंत्र्यात जखडलेली पाहताच रामदासांना वेदना झाल्या आणि म्हणूनच देवाइतकेच त्यांनी देशाला व राष्ट्राला महत्वाचे मानले.देश भौगोलिकता दाखवतो पण राष्ट्र ही संकल्पना देशाची आंतरिक कल्पना स्पष्ट करते; आणि तिचा संबंध मनाशी, अंतरात्म्याशी असतो.देश डोळ्याने दिसतो पण राष्ट्र अंतर्मनानेच बघता येते.रामदासांनी देवाबरोबरच देशाचा व देशा बरोबरच राष्ट्राचा विचार केला म्हणून मनाशी संबंधित असलेल्या राष्ट्र विचाराला प्राधान्य देउन राष्ट्र घडणीचाही विचार मांडला.हा मांडतांना त्यांनी त्यासाठी 'राजकारण' या नव्या शब्दांची नव्यानेच मांडणी केली.

राष्ट्र म्हणजेच राज्य, देश, साम्राज्य, प्रजा आणि धर्म म्हणजे न्याय, निती, सत्य, सद्गुण, त्याग, निष्ठा, कर्तव्य.. भारतीय राष्ट्रधर्म समाज जिवनाच्या सगळ्या अंगांना व्यापणारा आणि जीवनातील सगळ्या श्रेष्ठ तत्वाचा आविष्कार करणारा आहे. सबंध भारतासंबंधी राष्ट्रनिष्ठेची वृत्ती समर्थांच्या राष्ट्रधर्मात व्यक्त झाली आहे. बारा वर्षांच्या तीर्थयात्रेच्या काळात बद्रिकेदारापासून रामेश्वरापर्यंत सबंध भारतात समर्थांनी मठ म्हणजे विद्येची आणि राष्ट्रकार्याची केंद्रे कशी व कोठे स्थापन केली आणि त्या मठात महंत म्हणून कोणाकोणाची नियुक्ती केली त्याचे विस्तृत वर्णन गिरीधराने .. समर्थप्रताप.. या ग्रंथात केलेले आहे. म्लेच्छ राजसत्तांनी देव पाडली. पाशव्वी हिंसा केली. सबंध भारत दु:ख दारिद्रय , उद्वेग, चिंता यांनी भरुन गेला. या सत्याचे प्रकटीकरण फक्त समर्थ वाङ्मयातच आढळते. क्षात्रतेजाच्या बळावर परकियांचा नाश करुन स्वराज्य स्थपनेचा महाराष्ट्रधर्म त्यांनी शिवाजी महाराजांना सांगितला आणि त्याचा सबंध राष्ट्रात विस्तार करण्याचा उपदेश संभाजीराजांना केला.बुडाले सर्वही पापी. हिंदुस्थान बळावले.. या समर्थांच्या भविष्यदर्शनातही सबंध राष्ट्रांच्या उन्नतीचे ध्येय प्रकट झाले आहे. भारतातील सगळ्या प्रमुख तीर्थ स्थानांची आणि दैवतांची वर्णने समर्थ्यांच्या दासबोधात आहेत. तमिळनाडु, आंध्रप्रदेश, कर्नाटक, महाराष्ट्र, गुजरात, मध्यप्रदेश अशा भारताच्या मोठमोठया प्रदेशात समर्थ संप्रदायाचा विस्तर जेवढा झाला तेवढा इतर कोणत्याही संप्रदायाचा झाला नाही. तमीळ तेलगू पासून हिंदी - उर्दु पर्यंत दासबोधाचे आणि मनाच्या श्लोकांचे अनुवाद झालेले आहेत. समर्थांच्या राष्ट्रधर्माला असे सबंध राष्ट्राचे अधिष्ठान प्राप्त झाले. समर्थांचा एक शिष्य शिवाजी महाराजाबरोबर आग्र्याला गेला होता. समर्थशिष्यांच्या देशव्यापी यंत्रणेने महाराजांना परतीच्या मार्गावर साहय केले

असा एक तर्क आहे. समर्थांच्या राष्ट्रप्रेमाने प्रातांच्या आणि भाषाच्या सीमा ओलांडल्या होत्या.

साहित्याचा संबंध त्या त्या काळाच्या प्रवृत्तीशी व त्या त्या काळातल्या समाजप्रकृतिशी असतो हे जर ध्यानी घेतले तर समर्थ रामदास राष्ट्राचा विचार देशप्रकृतिच्या संदर्भात करीत होते हे मान्य करावे लागते. त्या काळात तर भूमिनिष्ठाच संपुष्टात आली होती ती नव्याने मनात निर्माण करण्याची गरज होती नव्हे; ती त्या काळाची प्रकृतीही होती.'राष्ट्र राज्याचे रक्षण । राष्ट्र राज्याचे कारण' हे दासोपंतांनी अगोदरच नमूद करुन ठेवलेच होते.तोच विचाराचा धागा पुढे ओढून रामदासांनी राजकारणाला हरिकथेनंतरचे दुसरे स्थान दिले आहे.रामदासांना ते आग्रहानेच द्यावे लागले कारण समाजमनातूनच देश, राष्ट्र या विषयीच्या संकल्पना अस्तंगत झाल्या होत्या.त्या पुन्हा निर्माण करण्याची गरज होती म्हणूनच रामदासांनी मनाला महत्व दिले.

लोक कल्याणा इतकेच राष्ट्र कल्याण ही महत्वाचेच असते म्हणून रामदासांनी राष्ट्र, राज्य यांचा विचार सातत्याने केला व आपल्या चिंतनातून त्यासाठी नवा मार्गही दाखविला.राष्ट्र कल्याणातच त्यांनी परमार्थ पाहिला होता.म्हणून स्वार्थ निरपेक्ष माणसांच्या फौजेला महत्व देवून शिष्यवरांची मोठी रांग उभी केली.राष्ट्र प्रेमाची कल्पना ही परंपरागतच निर्माण झालेली आहे. परचक्राची दुष्ट छाया तिच्यावर पडल्याने ती ती अस्तंगत झाल्यासारखी बनली होती. म्हणूनच रामदासांनी 'वन्ही तो चेतवावा' म्हणून मनातला राष्ट्रप्रेमाचा वन्ही चेतवण्याचा प्रयत्न केला.

समर्थ रामदासांच्या काळात भूमी गुणांनाच केवळ विसर पडलेला नव्हता तर सर्वश्रेष्ठ तत्व असलेली भूमी मनातून कायमची दूर झाली होती.तिचे अस्तित्व मनातही उरलेले नव्हते.स्वार्थ निरपेक्षतेने अखंड कृती करणाऱ्या भूमीवर जगणारेच स्वार्थापोटी तिला विसरले होते.तिचे भान कोणत्याही मनात शिल्लक राहिले नव्हते.अशाचवेळी रामदासांनी भूमी या महान तत्वाला प्राधान्य देउन तिच्यावर वास्तव्य करणाऱ्यांच्या मनाला जाग आणली. आणि त्याच मनाला बोध करुन मनाची सारी सृष्टीच बदलून टाकली.

समर्थांच्या राष्ट्रधर्मात वर्गभेद, जातिभेद, पंथभेद, नागरी - ग्रामीण भेद, विद्यासंपन्न सामान्यजन भेद अशासारख्या कोणत्याही भेदाला स्थान नाही. भेटो कोणी एक नार, धडे महार चांभार, त्याचे राखावे अंतर, या नाव भजन,--- उच नीच म्हणो नये, सकलांचे, निववावे हृदये, कुग्रामे अथवा नगरे, पाहावी घरांची घरे, --- प्राणीमात्र बोलवावा, आप्तपणे, --- ब्राम्हणाचे ब्रम्ह ते सोवळे, शूद्राचे ब्रम्ह ते ओवळे, ऐसे तेथे काही वेगळे, असेचिना,
--- ऐसे कैसे रे सोवळे, शिवता होतसे ओवळे, हाडांच्या सगट मोळया, पाणिया सोवळया, होती कैशा,,

"धर्मकारणा बरोबर राजकारण करणारा एकमेव संप्रदाय म्हणजे समर्थ संप्रदाय. लोकाव्दारासाठी निर्माण झालेली शिस्तबध्द,योजना बध्द संघटना म्हणजे समर्थ संप्रदाय. इस्लामच्या धार्मिक व राजकीय अशा दूहेरी आक्रमणाला तोंड देण्यासाठी समर्थांनी संघटनेव्दारे समाजाला धर्मकारणातून राजकारण शिकविले."

रामदास विश्वाची चिंता वाहत होते आणि याच विश्वात भूमीतत्व आले होते. आणि अशाच भूमीच्या सान्निध्यात कडेकपारीत, तिच्या सौंदर्याच्या सान्निध्यात त्यांनी आपल्या महान ग्रंथाची दासबोधाची निर्मिती केलेली आहे. समर्थांच्या सर्व वाङ:मय कृतींमागे प्राचिन परंपरेची, सेस्कृती प्रेमाची, कर्तव्यनिष्ठेची खास अशी प्रेरणा होती.

भक्ति मार्ग हा वैदिक योगी , लिंगायत जंगम आणि मुसलमान सुकी या साऱ्यासाठी आहे. असे सर्व लोकसंग्रहाचे तत्वंज्ञान समर्थांच्या राष्ट्रधर्मात आढळते. याउलट समर्थानंतर शंभर वर्षा पर्यंत सामान्य समाज आणि ग्रामिण समाज यांचा विचार आणि पर्यायाने सहभाग पाश्चात्य राष्ट्रवादात नव्हता. अस्पृश्यतेविरुध्द फार मोठे संघर्ष आधुनिक भारतातील सुधारकांना करावे लागले. पण १७ व्या शतकात समर्थांनी शिवराज्याभिषेकाच्या सुमाराला चाफळ येथे शुद्रांचे भोजन घडवले होते. रायाने करावे राजधर्म, क्षत्री करावे क्षत्रीधर्म,, ब्राम्हणी करावे स्वधर्म, --- ज्याचा ज्याचा जो व्यापार , तेथे असावे खबरदार --- असा राजा पासून सामान्यांपर्यंत

सर्वांचा विचार आणि सहभाग त्यांचा राष्ट्रधर्मात होता विद्या संपन्न ब्राम्हणवर्गाचे स्तोम न माजवता त्या वर्गातील महतांना त्यांनी समाज सेवक आणि राष्ट्रीय कार्यकर्ते बनवले पाश्चात्य मध्यमवर्गीय राष्ट्रवाद्यांप्रमाणे सत्ता संपत्ती साठी त्यांनी राजसत्ते बरोबर भगीदारी केली

ISSN 2319-4979

नाही. समर्थांच्या राष्ट्रधर्माचे अपूर्व आणि आद्वितीय वैशिष्टय असे की त्यांची महंत संघटना राजसत्ता आणि अर्थसत्ता यापासुन संपूर्णपणे अलिप्त आणि स्वतंत्र होती. समर्थांनी राष्ट्रीय कार्यकर्ते ही सबंध जगाला दिलेली पहीली देणगी आहे.

समर्थांचा 'दासबोध' हा विविध विषय विवेचनांनी भरलेली असून ते एक प्रकारचे ज्ञान भांडारच आहे.व्यक्तिमत्वाचा विकास तोही सर्वागीण दृष्टया कसा व्हावा याचा अत्यंत बारकाईने विचार करुन समर्थांनी दासबोधात अत्यंत जिव्हाळ्याने विवेचन केले आहे.

समर्थांनी वळणदार अक्षर; अक्षर हे व्यक्तिमत्वाचे एक प्रमुख अंग आहे. अक्षरावरुन माणूस नुसता ओळखता येत नाही तर अक्षरातून माणसाचा स्व-भावही ओळखता येता येथपासून तर लोकजीवनातील आरोग्य, आरोग्यासाठी शरीर सौंदर्य, सौंदर्य संपन्न मन, निसर्गातील सौंदर्य, अशा माणसाच्या शरीराशी व मनाशी जोडल्या जाणाऱ्या प्रत्येक अंगाचा, गुणांचा विचार करतात. माणसाचा देह देवरुप बनवणे हेच त्यांच्या दासबोध निर्मितीचे खरे कारण असून देह व देव याच्यातला देश शोधून तो समर्थ करणे हे त्यांचे जीवित कार्य होते.

"आधी प्रपंच करावा नेटका, मग परमार्थ साधावा" अशी शिकवण देत असतांनाच त्यांनी राष्ट्रधर्माचा विसर कधी ही पडू दिला नाही. रामदासांनी भक्ती मुळीच दुय्यम मानली नाही.उलट पक्षी भक्तीची कक्षा त्यांनी राष्ट्र हया कल्पनेपर्यंत नेउुन भिडवली.

राष्ट्र ही आंतरिक भावनिष्ठा भूमीच्या प्रतिकातून साकारते.तामदास कडेककपारी, दऱ्याखोऱ्यातून निसर्ग सान्निध्यात हया भूमीशी तादात्मतेने विचार मंथन कराचे.भूमी ही सृजनशील आहे. ती जीवनधारणा करणारी, जीवन फुलवणारी, पोषण करणारी, विकास साधणारी, विकसित करणारी, जीवनाला अर्थ देणारी, पूर्णता आणणारी, उदात्तता सांगणारी, जगावे कसे व जगवावे कसे याचे आदर्श प्रतिपादन करणारी, मातेच्या ममतेने सर्वांना सामावून घेउुन हित चिंतणारी आहे. देवत्व देणारी, दिव्यत्व दाखणारी आहे.गती देणारी आहे.शक्ती दाखवणारी आहे.तिच्यामुळे मानवी जीवनाला अर्थ आहे.भूमी म्हणजे नुसती माती न समजता समता, ममता आणि कृतार्थता देउुन जीवन चैतन्यमय करणारी "सुजलाम सुफलाम सस्यशमला" आहे.

हया भुमीच्या रक्षणासाठी समर्थांनी तत्कालीन समाजाची मनोभूमी नांगरुन तयार करण्याचे कार्य परीश्रम पूर्वक केले होते.समर्थांचे राजकारण हे केवळे सत्तेचे नव्हते तर ते लोक कल्याणाचे होते.लोकातील सुखासीनताच त्यांना अपेक्षीत होती.ते राजकारणी माणूस घडवणारे होते व देश सबल करण्याचे अनेक मार्ग त्यात एकवटले होते.

**राजकारण बहूत करावे | परंतु कळोच नेदावे |**
**पर पीडेवरी | नसावे अंत:करण |**
**लोकपारखून सांडावे | राजकारण अभिमान झाडावे |**
**पुन्हा मेळवून घ्यावे | दुरिल्या दोरे ||**

## संदर्भ


**डॉ.माधव रा. पोतदार अ.अ.कुलकर्णी, (२००९)** राम रंगी रंगले मन अनुबंध प्रकाशन - ISBN-८१-८६१४४९७-८

**सौ प्राची प्रदिप चिकटे, (२००७),** भारतीय जीवनधर्म परंपरा आणि श्री समर्थ रामदास श्री. प्रभाकर पुजारी, गोकुळ मासिक प्रकाशन समर्थ, राष्ट्र, राजकारण, राष्ट्रधर्म आणि माणुसकी